

# शहाळ

बालकवितासंग्रह

डॉ. सतीश कानविंदे

# शक्कल

डॉ. सतीश  अ. कानविंदे

एम. बी. बी. एस.(मुंबई)

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# शक्कल (बालकवितासंग्रह)

कवी : डॉ. सतीश कानविंदे

sakanvinde@googlemail.com

Dr. Satish A. Kanvinde

18/ MN 5 / Godavari Scty.

Kashish Park / Thane (West)

Mobile-9821186412

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

संपादक :- अनघा हिरे ( ९४२२२८४११६)

प्रकाशन :- ११ मार्च २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फोरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचानाव्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# अर्पणपत्रिका

वर्तमानपत्रात छापून आलेल्या माझ्या कवितांनी
ज्यांना ज्यांना आनंद दिला
त्या सर्व आबालवृद्ध वाचकांना
हा बालकवितासंग्रह
अर्पण.

## परिचय



नांव - डॉ. सतीश अनंत कानविंदे

शिक्षण - Grant Medical Collage (जे .जे . हॉस्पिटल) येथून १९७७ साली एम.बी.बी.एस. होऊन बाहेर पडलो. त्यानंतर मंडणगड (जि.रत्नागिरी) आणि बागमांडला (जि. रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून नोकरी केली. १९८२ साली आयरे गांव, डोंबिवली येथे स्वत:चा दवाखाना सुरु केला.

१९८७ साली पहिली बालकविता लिहिली. तेव्हांपासून कवितालेखन जोमाने सुरु झाले. आजपर्यंत लिहिलेल्या तीनशे कवितांपैकी जवळजवळ दोनशे पन्नास कविता बालकविता आहेत. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सामना, लोकमत, नवशक्ती, ठक ठक,लोलीपोप (Lollypop), ज्ञानरंजक टोनिक(Tonic), सारस्वत चैतन्य,डायलोग (Dialouge), इ. अनेक नियतकालीकांमधून दोनशे चाळीस कविता प्रकाशित झाल्या आहेत.

[ डायलोग (Dialouge) हे इंडियन मेडीकल असोसिएशनच्या डोंबीवली शाखेचे मुखपत्र आहे.]

२०१३ साली मी अमेरिकेत मुलाकडे गेलो असताना तेथील चार महिन्यांच्या वास्तव्यात न्यूयार्क येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नियतकालिकांमध्येही माझ्या चार कविता प्रकाशित झाल्या होत्या.

१९९८ साली एका नवीन प्रकाशकाने माझा 'बोबडकांदा' हा बालकवितासंग्रह प्रकाशित केला पण त्याचे व्यवस्थित वितरण न झाल्यामुळे तो वाचकांपर्यन्त पोहोचलाच नाही.

इ प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रकाशित होणा-या या कवितासंग्रहास चांगला प्रतिसाद मिळाला तर आणखीही काही कवितासंग्रह इथेच प्रकाशित करण्याची इच्छा आहे.

**Dr.Satish A. Kanvinde**
18/ MN 5 / Godavari Scty.
Kashish Park / Thane (West)
Mobile-9821186412

## मनोगत

नमस्कार

आबालवृद्ध मित्रांनो (आणि मैत्रिणिंनो सुद्धा).

माझा 'देव खातो शेव' हा बालकवितासंग्रह इ प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपल्या भेटीस येत आहे. यातील कविता तुम्हाला नक्कीच आवडतील. मी या कवितासंग्रहाला 'बालकवितासंग्रह' असे म्हटले याचा अर्थ हा कवितासंग्रह लहान मुलांनीच वाचावा आणि इतरांनी तो वाचू नये असे मुळीच नाही. माणूस कितीही मोठा झाला तरी त्याच्या मनाचा एक कोपरा त्याच्या बालपणाने व्यापलेला असतोच. म्हणूनच माझ्या या कविता वाचताना सर्वच वाचक आपल्या बालपणात रमून जातील याची मला खात्री आहे.

१९८७ साली मी बालकवितालेखनाला सुरुवात केली. 'हत्तीचा लठ्ठपणा' ही माझी पहिली बालकविता केवळ आठ ओळींची होती आणि त्यात सव्वीस शब्द होते. ही कविता लोकसत्तामध्ये छापून आल्यामुळे'मी बालकविता लिहू शकतो ’ हा आत्मविश्वास मला आला आणि त्यानंतर एकामागोमाग एक नवीन नवीन विषय घेऊन बालकविता लिहिण्याचा मी सपाटाच लावला. या कविता अनेक नामांकित वर्तमानपत्रात प्रकाशित झाल्यामुळे माझे नाव संपूर्ण महाराष्ट्रात झाले. सुरुवातीच्या काळात लोकसत्तेमधील कवितेखाली कवीचा पूर्ण पत्ता छापण्यात येत असे. त्यावेळी

महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून मला माझ्या कविता आवडल्याची पत्रे यायची.

बालकविता मी जरी सहजपणे लिहित असलो तरी बालकविता लिहिणे सर्वात कठीण आहे असे ब-याच जणांनी मला सांगितले आहे.असेलही  कदाचित. पण मला मात्र त्यात काही कठीण वाटत नाही.म्हणूनच मी लिहिलेल्या तीनशे कवितांपैकी दोनशे पन्नास कविता ह्या बालकविता आहेत.

यापूर्वी १९९८ साली माझा 'बोबडकांदा ' हा बालकवितासंग्रह पुस्तकरूपात प्रकाशित झाला होता. पण प्रकाशकाने त्याचे वितरण व्यवस्थित न केल्यामुळे तो वाचकांपर्यन्त पोहोचलाच नाही. अन्यथा त्याच्या अनेक आवृत्त्या काढाव्या लागल्या असत्या. त्या अनुभवामुळे मी पुन्हा पुस्तक प्रकाशनाच्या वाटेला गेलो नाही. त्यापेक्षा मला माझी कविता वर्तमानपत्रात छापून आलेली आवडते कारण ती एकाच वेळी लाखो लोकांपर्यंत पोहोचते. आता इ प्रतिष्ठानच्या माध्यमातून तर ती लाखोच काय करोडो लोकांपर्यंत आणि ती  सुद्धा जगभरातील वाचकांपर्यंत जाणार आहे.

मी डॉक्टर आहे आणि बालकविता लिहितो म्हणजे मी बालरोगतज्ञ असणार असे ब-याच जणांना वाटते. पण मी बालरोगतज्ञ नाही. पण बालमनाची नाडी मला अचूक सापडलेली आहे याची खात्री तुम्हाला माझ्या या कविता वाचताना पटेल.

काही वर्षांपूर्वी मला डोंबीवलीतील एका प्राथमिक शाळेच्या स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणा म्हणून बोलावले होते. मी त्यावेळी मुलांना आणि पालकांना मार्गदर्शक असे थोडे बोललो आणि नंतर माझ्या काही कविता ऐकवल्या. कार्यक्रम संपल्यानंतर तेथे आलेल्या संस्थेच्या एका पदाधीका-याने मला सांगितले, "पाहुणे बोलताहेत आणि सर्वजण शांतपणे ऐकताहेत हे आज मी पहिल्यांदाच बघितले".

माझा हा कवितासंग्रह वाचायला सुरुवात केल्यानंतर शेवटची कविता वाचल्यानंतरच तो दुस-याच्या हातात द्यावा असे कोणाला वाटले तर तो माझ्या कवितांचा सन्मान असेल. तसे झाले तर मला जरूर कळवा. मी आपल्या अभिप्रायाची वाट बघतोय. कारण अजून ब-याच कविता तुमच्या भेटीला यायला उत्सुक आहेत.

- डॉ. सतीश अ. कानविंदे
- Mobile 9821186412
- e mail <sakanvinde@yahoo.com>

# अनुक्रमणिका


- देव खातो शेव
- अफलातून
- आईशप्पथ
- इंटरव्ह्यू
- ऐक रे बाप्पा
- काका रडला
- कोकणात चला
- कोल्होबांचे रक्तदान
- खादाड
- गोविंदा आला
- अंतराळवीर कावळा
- घंटा शाळेची
- चिडूबाई
- जीवनसाथी
- डॉक्टरकाका
- ढब्बू ढोल
- नामांतर
- पंख्याला आली चक्कर
- पहिलीच भाऊबीज
- पाहुणचार
- बंडू स्वर्गात जातो
- बड्ड्याबोळ
- बाळाची गादी
- भातुकली
- माझी आजी
- मुंगी आणी मांजर
- लौकर मोठा कर
- विमा उतरवा विमा
- शक्कल
- सांगाल कां कोणी ?

## देव खातो शेव



बंडूने एकदा देवापुढे
नैवेद्य म्हणून ठेवली शेव
आणि खरंच तिथल्या तिथे
प्रकट की हो झाला देव
म्हणाला "लौकर वर माग
चुकेल माझी फास्ट ट्रेन"
बंडूला काही सुचेचना
सुन्न झाला त्याचा ब्रेन
तेवढ्यात त्याचे चालले डोके
कल्पना सुचली त्याला झ्याक
म्हणाला "देवा आठवड्यातले
कामाचे दिवस काढूनच टाक
रोज असू दे रविवार
अभ्यासाची कटकट नको
शाळेसाठी रोज सकाळी
झोप मोडून उठणे नको

मस्तपैकी झोपा काढीन

उठेन सकाळी दहा वाजता

आणखी तासभर लोळत राहीन

किशोरकुंज वाचता वाचता "

अंतर्धान पावला देव

हळूच म्हणून "तथास्तू!"

आई म्हणाली हलवून "बंड्या,

झोपेत कां रे हसतोयस तू ? "



# अफलातून



अजब माणसं
भेटली सात
होते त्यांना
चार चार हात
एकेका हाताला
पंचवीस बोटं
प्रत्येक बोट
एवढुसं छोटं
डोकं फिरायचं
गरगर गोल
तोंडाचं बोळकं
खूपच खोल
चकचकीत होती
त्यांची कातडी
बाहेर काढून
दावायचे आतडी



उंच उडायचे

आकाशात दूर

सूर्रकन् मारायचे

पाण्यात सूर

खात होती

नाकानं भात

असली माणसं

ती अजब सात

## आईशप्पथ



आईशप्पथ दिसली मला
आकाशातली म्हातारी
खात होती पुढ्यात घेऊन
कंदी पेढे सातारी
एका हाताने मोठं जातं
फिरवित होती गडागडा
बर्फ घेऊन दळत होती
आवाज करीत कडाकडा
चमकत होती वीज आणि
खाली पडत होत्या गारा
पाऊस सुद्धा आला होता
सोबत घेऊन सुसाट वारा



आकाशातल्या म्हातारीचे

कंदी पेढे संपले खाऊन

जातं थांबलं नी कडाडणारी

वीज बसली कोप-यात जाऊन

शांत झाला सुसाट वारा

कोसळणारा थांबला पाऊस

आई म्हणाली "शाळेत जा रे

आज नको घरी राहूस"

# इंटरव्ह्यू

प्राणी झाले कमी म्हणून
चिडून गेली राणी
"घ्या" म्हणाली "माझ्या बागेत
नवीन नवीन प्राणी"

पेपरमध्यें जाहीरात गेली
'पाहीजेत प्राणी खूप
हवं तितकं खायला मिळेल
बदलून जाईल रूप



अर्ज घेऊन मुलाखतीला
एक तारखेला यावे
निवड ज्यांची होईल त्यांनी
लगेच बागेत जावे'



एक तारखेला रविवार होता

झुंबड झाली फार

रांग लावायला पोलीसांच्या

तुकड्या आल्या चार

रांगेतले प्राणी एकाएकी

जाऊ लागले पळून

मुलाखतकारांना शंका आली

पाहीले त्यांनी वळून

पोलीस सुद्धा घाबरून गेले

चिंतेत पडले घोर

कारण रांगेत अर्ज घेऊन

होता डायनासोर

# ऐक रे बाप्पा

गणपतीबाप्पा
पावशील कां ?
मदतीला आमच्या
धावशील कां ?
गृहपाठ असतो
भरमसाठ
कविता सगळ्या
हव्यात पाठ
लौकर झोपायला
मिळतच नाही
सकाळी मात्र
उठायची घाई
कशाचा कशाला
नसतो मेळ
खेळायला नाही
मुळीच वेळ



आजारपणात

शाळा बुडते

परिक्षेत हमखास

दांडी उडते

आईबाबांची

बोलणी नी मार

डोळयातून लागते

पाण्याची धार

ऐक रे बाप्पा

आमची हाक

शाळाच सगळ्या

बुडवून टाक



## काका रडला

एकदा माझ्या काकाला
मिरची झोंबली नाकाला

रागात तेव्हां काकाने
कांदे सोलले नाकाने

वाट लागली नाकाची
हालत झाली काकाची

डोळे त्याचे चुरचुरले
नाक सुद्धा फुरफुरले

तोरा त्याचा झाडाला
नी काका चक्क रडला



# कोकणात चला



सुट्टी पडली
कोकणात जाऊ
आंबे,काजू नी
फणस खाऊ

डोंगरात शोधू
करवंदाची जाळी
खाऊ डोंगरची
मैना काळी



मालवणी खाजं
खडखडे लाडू
सकाळ संध्याकाळ
पोटात धाडू

पित्त वाढलं तर
कशाला भ्यायचं ?
अमृत कोकम
ढोसत ऱ्हायचं

येणार कां मग
कोकणात जायला ?
या तर लायनीत
तिकीट घ्यायला



# कोल्होबांचे   रक्तदान

कोल्होबांनी एकदा
रक्तदान केले
रक्त काढताच कोल्होबा
कोमामध्ये गेले



कोल्होबांना द्यावे लागले
चार बाटल्या सलाईन
उठून बोलले कोल्होबा
"नाऊ आय एम फ़ाईन "

कॉफी प्यायले पेलाभर
नी ग्लुकोज बिस्कीटं खाल्ली
तेव्हां कुठं त्यांची नाडी
पहिल्यासारखी चालली

कार्ड घेऊन खिशात टाकत
बोलले करून टाटा
"रक्त हवं असल्यास मला
केव्हांही येऊन भेटा"

## खादाड

दिवाळीतला फराळ खाऊन
तट्ट फुगलंय माझं पोट
बटणच लागत नाहीत याचे
घालू कसा मी हा बुशकोट?



बेसनाचे लाडू दिसतात छान
पहिल्यांदा मी तेच घेतो
लक्ष कोणाचं नसलं तर
दोनचार तरी खिशात घालतो

नंतर मोर्चा चकलीवरती
पाच सहा चकल्यांना अटक करतो
पोटातल्या तुरुंगात मी मग
एक एक करीत त्यांना भरतो

करंज्याकडे लक्ष जाताच
तोंडाला माझ्या सुटते पाणी
किती जातात पोटात माझ्या
हिशेब नाही ठेवीत कोणी

गोड करंज्या खाऊन मग
कसंतरीच वाटू लागतं
तिखट चिवडा नी शेव खाल्ल्यावर
हळूहळू मग बरं वाटतं

आई म्हणते "हा जेवत नाही
झालंय काय याला असं ?
एवढा फराळ खाल्ल्यावर मी
सांगा, जेवण तरी घ्यावं कसं ?



## गोविंदा आला

उंचावरती बांधला दोर
ताणून घेतला लावून जोर

दह्याची हंडी मधोमध बांधली
नोटांची माळ त्यालाच टांगली

वाजतगाजत बाले येतील
अंगावर पाणी ओतून घेतील

निधडी छाती मनात ना डर
माणसांचे लागतील थरावर थर

चुकीची हालचाल एक जरी झाली
अखेरच्या क्षणीही कोसळतील खाली

मनाची जिद्द मोठी फार
कशाला सांगा मानतील हार?

यत्न आपले नाहीच सोडणार
हंडी शेवटी नक्कीच फोडणार

आला रे आला गोविंदा आला
चला खेळू या दहीकाला



## अंतराळवीर कावळा


कावळ्याने ठरवले अंतराळात जायचे
ग्रह आणि ता-यांना जवळून पहायचे

उंचच उंच उडाला अंतर काही संपेना
ग्रह तारे तर सोडाच आपली पृथ्वीही दिसेना

घाबरला मग खूप, आता करायचे काय?
दमला होता फार पण टेकणार कुठे पाय?

तेवढ्यात एक उपग्रह जवळून गेला
कावळ्याने लिफ्टसाठी खूप प्रयत्न केला

कावळ्याचा हा प्रयत्न एकदमच फसला
तेव्हां आपला मृत्यू त्याला समोरच दिसला



तरीपण जोर करून अंतराळात गेला
हवेवाचून लगेच तडफडून मेला.

## घंटा शाळेची

उलटं टांगून कायमचं
बदडून घ्यावं रोज रोज
माझ्याच वाट्याला कां बरं द्यावे
देवाने हे असले भोग?

शाळा जेव्हां भरते,सुटते
सपाटून मिळतो मला मार
तासातासाला एकेक फटका
मधल्या सुट्टीतही अनेक वार

मार काही चुकत नाही
केली जरी सगळ्यांशी कट्टी
म्हणूनच वाटतं मनापासून
शाळेला असावी रोजच सुट्टी



## चिडूबाई

चिडूबाई चिडली
उग्गाच रडली
धावत सुटली
धप्पकन् पडली



खोडकर बाळू
पुढ्यात बसला
तिच्याकडे पाहून
फिस्सकन् हसला

चिडूबाई उठली
बाळूला पाडलं
चांगलंच त्याला
बुकलून काढलं

## जीवनसाथी

वाघोबाच्या
किडल्या दाढा
म्हणाला "डॉक्टर
आत्ताच काढा

सोसवत नाही
दुखतात खूप
सुजलेल्या हिरड्यांनी
बदललंय रूप

डॉक्टर बोलले
"सगळेच दात
किडून गेलेत
आतल्या आत

दात काढून
कवळी लावा
दातांनी मग
काहीपण चावा"



वाघाने केला
विचार जरा
म्हणाला "डॉक्टर
तसंच करा"

निर्णय तेव्हां
योग्यच वाटला
बोळकं पहाताच
कंठ दाटला

बोलला घेऊन
कवळी हाती
"आता तू माझी
जीवनसाथी"



## डॉक्टरकाका

वाईट्ट आहेत डॉक्टरकाका
औषध देतात कडू
गोळ्या सुद्धा घ्यायला लावतात
मला येतं रडू

वाईट्ट आहेत डॉक्टरकाका
इंजक्शन पण देतात
किंचाळून मी रडते तेव्हां
गालगुच्चा घेतात



वाईट्ट असले डॉक्टरकाका
तरी वाटतात हवे
तेच तर आजा-यांना
जीवन देतात नवे

## ढब्बू ढोल

ढब्बू ढोल
पैसा गोल
तोंडात तोबरा
कसला बोल

पोटाच्या डे-यात
भरलंय काय?
आणलेस कां चोरून
हत्तीचे पाय?

धावायचे नकोस
घेऊस श्रम
चालतानाच तुला
लागतोय दम

चौघांचं खाणं
खातोस एकटा
मोडून टाकतोस
वजनाचा काटा

ढब्बू ढोल
पैसा गोल
व्हायचंय कां बारीक
लौकर बोल

व्हायचं असेल
बारीक जर
डायटींग आणि
व्यायाम कर



## नामांतर

नामांतराचे वेड
आमच्याही घरात शिरले
एकेकाचे डोके मग
एकदमच फिरले
आई म्हणाली "आई,आईचा
वैताग आलाय ज्याम
आजपासून तुम्ही मला
हाक मारायची मॉम
बाबांना आई बोलली
"मला अगं म्हणणं सोडा
नांव माझं घेऊन
पुढे डार्लिंग शब्द जोडा"
बाबांनाही स्फूर्ति आली
बघून आईचं फॅड
आम्हाला दिली ऑर्डर

"मला म्हणायचं तुम्ही डॅड"

बाबा झाले डॅड

नी आई झाली मॉममोत्या कुत्र्याला दादाने

नांव दिलं टाॅम

दादा,ताई दोघांनीही

जुनं नांव टाकलंय

मी मात्र जुन्याच नावात

माझं वेगळेपण राखलंय



## पंख्याला आली चक्कर


गरगर गरगर फिरता फिरता
पंख्याला एकदा आली चक्कर
तोल गेला त्याचा आणि
छताशी त्याची झाली टक्कर

छताचा उडाला टवका तेव्हां
छत म्हणाले "वेंधळा कुठला "
पंखा म्हणाला "तुझ्यामुळे बघ
एक हात माझा अर्धा तुटला"

तरीही पंखा फिरत फिरत
छताला करीत होता जखमा
खडखड खडखड आवाज ऐकून
धावत बाहेर आली रखमा

ओरडून म्हणाली "धावा बाई
कसा बघा हा झालाय पंखा
वाकडातिकडा फिरत फिरत
छताला सारखा देतोय दणका"

बाईसाहेब आल्या धावून
लाईटची बटणं बंद केली
छत म्हणालं हुश्श करून
"बरं झालं एकदाची कटकट गेली"



## पहिलीच भाऊबीज

इटुकल्या पाळण्यात मिटुकलं बाळ
मिटुकल्या बाळाची पिटुकली ताई
आज आहे बाळाची भाऊबीज पहिली
बाळाला ओवाळायची ताईला घाई

ताईने घातलाय परकर पोलका
नाकात चमकी नी गळ्यात हार
केसांचा अंबाडा त्यावर गजरा
ताईला त्यांचा होतोय भार

परकर सावरीत दुडुदुडु धावतेय
झोपलेल्या बाळाला म्हणतेय "उठ"
आईच्या मागे लावलाय लकडा
"घाल नां गं त्याला नवीन सूट"

छोट्याशा ताईची मोठ्ठी धांदल
बघतायत सगळे गालात हसत
ताई मात्र क्षणभर सुद्धा
एका जागी नाहीय बसत

ओवाळणीची तयारी झाली
रांगोळी घातली मांडून पाट
पाटावर आई बसली बाळाला घेऊन
समोर ठेवलं फ़राळाचं ताट

मदत घेऊन आजीची आपल्या
बाळाला ओवाळलं ताईने
बाळाच्या वतीने पिटुकल्या ताईला
ओवाळणी घातली आईने

हरखली  ताई लाडात आली
मायेने केले बाळाचे हाल
बाळाने जाणली ताईची माया
खुदकन हसलं पसरून गाल

## पाहुणचार

एका पडक्या घरात एकटी
राहत होती मनीमाऊ
शेजारचे उंदीर मुलांना सांगत
"तिकडे तुम्ही नका जाऊ"



मनीमाऊकडे एकदा किनई
पाहुणे आले लांबचे चार
काय करावे यांच्यासाठी ?
विचार तिला पडला फार

बाहेर आली तेव्हां तिला
उंदीर तिकडे दिसले दोन
एकाच झटक्यात पकडलं तिने
कळलंच नाही त्यांना आलंय कोण !

पाहुण्यांचा मुलगा झोपाळ्यावर बसून
म्हणत होता "झुला झुलाव"
मनी तिकडे शिजवत होती
पाहुण्यांसाठी 'उंदीर पुलाव'

## बंडू स्वर्गात जातो

बंडूला एकदा नारदमुनींनी
दर्शन दिले स्वप्नात येऊन
फेरफटका मारण्यासाठी
स्वर्गात त्याला ते गेले घेऊन
    ब्रह्मा,विष्णू,महेशाने
    त्याचे तिथे स्वागत केले
    आपापल्या महालामध्यें
    तिघेही त्याला घेऊन गेले
चित्रगुप्ताच्या दरबारात जाऊन
पाहीले त्याने तिथले काम
वैतागलेला चित्रगुप्त
डोक्याला होता लावित बाम



रेड्यावरती बसून यम
तयारी करीत होता जायची
सांगत होता "अपघातातली
शंभर माणसे आहेत यायची"

अमृतकलश चोरण्याचा बेत
पहारेक-याने पाडला हाणून
बंडूला नेऊन उभा केला
भर पावसात शिक्षा म्हणून

पावसात बंडू भिजला आणि
गात्रं न् गात्रं त्याची थिजली
खरं म्हणजे तेव्हां त्याची
गादीच होती चिंब भिजली



**बट्ट्याबोळ**

परिक्षेतील मार्क्स पाहून
आई म्हणते "आता अभ्यास वाढव"
दफ्तराचं ओझं वाहून
मी मात्र झालोय गाढव

शिशुवर्गापासूनच अभ्यासाच्या
पुस्तकांची असते रास
कुणालाच कसं कळत नाही
बालपणाचाच होतोय –हास

आईच्या डोक्यात नेहमी
माझ्या परिक्षेचे टेन्शन असते
बाबांना तर कामापुढे
बोलायलाही सवड नसते

गृहपाठ असतो भरमसाठ
आमची लागते पुरती वाट
संपवून उठता आई म्हणते
"कर आता पाढे पाठ"

नाव काढता खेळाचे
आईच्या रागाचा पारा चढतो
अभ्यासाला शिव्या देत
ढसाढसा मी सदा रडतो

पूर्वी कधी नव्हता म्हणे
शिक्षणाचा एवढा घोळ
हल्ली मात्र करून टाकलाय
कुणीतरी बट्ट्याबोळ



## बाळाची गादी

छोटासा बाळ
थंड आहे लादी
बाळासाठी आणलीय
छोटी छोटी गादी

गुबगुबीत गादीवर
बाळ झोपतो गाढ
बाळाचे करतात
सगळेच लाड

कधीकधी वाटतं
बाळाएवढं व्हावं
छोट्याशा गादीवर
मस्त पडून राहावं



"बाळाच्या गादीवर
झोपू कां मी थोडा?"
विचारलं की आई म्हणते
"तू  झालास आता घोडा"

ठरवलंय मी जेव्हां
घरात एकटा राहीन
बाळाच्या गादीवर
नक्कीच झोपून पाहीन

## भातुकली

दुपारच्या वेळात
भातुकलीच्या खेळात

पातेल्यात सात
कुरमु-याचा भात

शेवाची भाजी
कुरकुरीत ताजी

भाताचं धरण
अडवतं वरण

चिवड्याचं लोणचं
जेवण झालं आमचं



## माझी आजी

बुटुकबैंगण
माझी आजी
बोलता बोलता
चिरते भाजी

गोष्टी सांगत
भरवते घास
प्रत्येक घासाला
मायेचा वास



आजीचे आमच्या
जादूचे दात
बाहेर काढते
पसरून हात

जवळ ओढून
पापी घेते
चाॅकलेटसाठी
पैसे देते

रात्री पडते
कुशीत घेऊन
प-यांच्या राज्यात
सोडते नेऊन

रोज रोज देते
करून केक
आजी माझी
लाखांत एक

## मुंगी आणी मांजर

लाल मुंगी
नेसली लुंगी

मांजरानं पाह्यलं
बघतच राह्यलं

लपून बसलं
फिस्सकन हसलं

चिडली मुंगी
फेकली लुंगी

जोरात धावली
मांजराला चावली



## लौकर मोठा कर

सुटत काही नाही अभ्यासाची कटकट
अभ्यास करत नाही म्हणून आईची वटवट

क्रिकेट खेळायला आमचा दादा रोज रोज जातो
मला मात्र फक्त रविवारीच नेतो

ताईला हिंदी सिनेमा आवडतात फार
"मी येतो" म्हटलं तर मला मिळतो मार

ऑफीस टूरच्या नावाखाली बाबा भटकतात
बाहेर मी पडलो तर लगेच हटकतात

मैत्रिणींकडे जायचा असतो आईचा सपाटा
मित्रांकडे मी गेलो तर मला मात्र धपाटा

नको कुणाची गुलामी नको कुणाचा डर
त्यापेक्षा देवा मला तू लौकर मोठा कर

## विमा उतरवा विमा

बालमित्रांनो तुमच्यासाठी
विमा कंपनी मी केलीय सुरू
पटापट घ्या पोलिसी अन
हप्ते लगेच लागा भरू

तुमच्या जुन्या पुस्तकांचा
उतरून टाका आजच विमा
पुढच्या वर्षी पैसे घ्या
झाला जरी त्यांचा खिमा

माझ्याकडे विमा उतरवा
घ्याल जेव्हां दफ्तर नवे
जरासं फ़ाटलं तरी सांगा
दुरुस्तीला पैसे हवे

आमच्या कंपनीत विमा बरं कां
गणवेषाचाही उतरला जातो
फाटका  गणवेष दिल्यावरती
नवीन आम्ही लगेच देतो


परीक्षेत नापास झालात तरी
बाळगायची नाही आता तमा
उद्यापासून उतरवू आम्ही
अकलेचाही तुमच्या विमा



## शक्कल

बाबांना  म्हटलं आणा
एक छानपैकी बॅट
तर बाबांनी काल आणली
नवीकोरी हॅट

मला आला राग
पण काहीच नाही बोललो
ऐकण्यात झाली असेल चूक
असेच धरून चाललो



आई म्हणाली "आता
ठेवून घेती हॅट
नंतर कधीतरी सांगेन
आणायला मी बॅट

ऑफिसात जाताना आज
बाबांनीच घातली हॅट
तेव्हां मात्र पडलो
आम्ही पुरते चॅट

नंतर लक्षात आले
ती बाबांची होती शक्कल
लपवण्यासाठी आपले
गुळगुळीत टक्कल



## सांगाल कां कोणी ?

एवढी कशी लांब
जिराफाची मान ?
सुपाएवढे कोणी केले
हत्तीचे या कान ?

झेब्राच्या अंगावर
कसे आले पट्टे ?
देतात कां बाबा त्याला
पाठीवरती रट्टे

वाघोबाची मावशी
एवढी कशी छोटी?
बोकोबाची मिशी
खरी की खोटी ?



# धन्यवाद

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail. com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com